रजि.नं. : ई-६९, अहमदनगर
# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/ 822 /2021
दिनांक : 12 JUN 2021

प्रति,

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

**विषय : आटा व बेसन गिरणीचे जाते आऊट सोर्स पद्धतीने टाकणे व बसविणेकामी कोटेशन देणेबाबत ...**

महोदय,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मेकॅनिकल विभागाकरीता आटा व बेसन गिरणीचे जाते आऊटसोर्स पद्धतीने टाकणे व बसविणे आवश्यकता आहे. याकामी आपणाकडून खालील तपशीलानुसार कोटेशन मागविण्यात येत आहे :

| अ.नं. | तपशील | जाते साईज | प्रती जातेचे (जोडीचे) दर |
|---|---|---|---|
| 01 | जातेला टाके मारणे | 16” | |
| 02 | | 18” | |
| 03 | नवीन जाते फिट करणे ( शॉफ्टला होल मारणे, त्यास बंद करणे- कामी शिसे ओतुन शॉफ्टला फिट करणे ) | 16” | |
| 04 | | 18” | |

उपरोक्तप्रमाणे आपले कोटेशन स्वत:चे फर्मचे लेटरहेडवर बंद पाकीटात “ **मेकॅनिकल विभाग - आटा व बेसन गिरणीचे जाते आऊटसोर्स पद्धतीने टाकणे व बसविणे**” असे पाकीटाचेवर स्पष्ट करुन, कोटेशन दिनांक - / 21/06/2021 पर्यंत ‘मा. मुख्यकार्यकारी अधिकरी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी’ या नावे पाठविण्याचे करावे.

## अटी व शर्ती

1. दरपत्रकधारकांनी दर सादर करणेपुर्वी प्रत्यक्ष प्रसादालय विभागातील आटा चक्कीचे पहाणी करुन दर द्यावयाचे आहेत..
2. दरपत्रकधारकांनी गिरणीचे जातेच्या साईजनुसार जाते टाकणेचे दर द्यावयाचे आहे.
3. दरपत्रकधारकांनी दरांबाबत चर्चा व वाटाघाटी होणार नसल्याने अंतिम दर द्यावयाचे आहे.
4. मुदतीत न आलेल्या दरपत्रके स्विकारले जाणार नाहीत/ विचार केला जाणार नाही.
5. दरपत्रकधारकांनी गिरणीचे जातेच्या साईजनुसार जाते टाकणेचे दर द्यावयाचे आहेत.
6. 16” व 18” गिरणीचे जाते खोलून टाके मारुन पुन्हा फिट करणेकामीचे दर द्यावयाचे आहे. तसेच नवीन जाते बसविणेकामी नवीन जातेला होल मारणे, त्यास बंद करणेकामी शिसे ओतुन व शॉफ्टला फिट करणेकामी कामाचे स्वतंत्र दर द्यावयाचे आहे.

.. 2 ..

7. जाते टाकणे व बसविणेकामीचा कालावधी दि. 01/07/2021 ते दि. 30/06/2023 अखेर दोन वर्षाचा राहील. ..
8. 16” व 18” गिरणीचे जातेची प्रत्येक एक जोडी टाकेमारुन स्टॉकमध्ये ठेवणे आवश्यक आहे.
9. जाते टाकणे व बसविणे साठी वापरणेत येणारे साहीत्य उदा.- छनी, हातोडी, ग्रांईडींग कटर इत्यादी तसेच नवीन जाते बसविणेकामी शिसे आणणेची जबाबदारी संस्थानची राहणार नाही. सर्व सुरक्षेची काळजी घेवून काम करावे लागेल, काम करतांना काही अपघात दुखापत झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.
10. जाते टाकणे व बसविणेची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची आढळुन आल्यास आपले दरपत्रक रद्द करणेत येईल.
11. जाते टाकणे व बसविणेकामी दरपत्रकधारकास कोणतीही अग्रीम (ॲडव्हान्स) रक्कम दिली जाणार नाही.
12. वेळोवेळी जाते टाकणे व बसविणेकामाची नोंद रजिस्टरवर संबंधीत उपभांडार पर्यवेक्षकाची सही घेणे दरपत्रक-धारकावर बंधनकारक राहील. मेकॅनिकल विभाग प्रमुख अथवा सा. अभियंता, कं. अभियंता यांनी वेळावेळी गिरणीचे जाते मेन्टनंन्स बाबत केलेल्या सुचनाचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहील.
13. नियमानुसार TDS कपात करणेत येईल.
14. जाते टाकणे व बसविणेनंतर बेअरिंग,शॉफ्ट व्यवस्थीत फिट करुन संस्थान प्रतिनिधीव्दारे आटा चेक करुनच जाते टाकणेची नोद रजिस्टरला घेणेत येईल.
15. संस्थानने गिरणीचे संख्येमध्ये वाढ केलेस कार्यादेश कालावधीत मंजूर दरातच काम करावे लागेल.
16. श्री साईबाबा संस्थान ही धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत द्यावी.
17. गिरणीचे जाते टाकणेबाबत काही वाद-विवाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टात न्याय कक्षेच्या अंर्तगत राहील.

12.6

(संजय जोरी)
**कार्यकारी अभियंता**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

D:\Mech:\Prasadalaya Repairing & Maint.:\Machinery Maint.